महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

हिंगोली शहरातील आदिवासी वसतिगृहाची दुरवस्था झाल्याबाबत

(१) ५६२२ (०९-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरातील रिसाला भागात असलेल्या आदिवासी वसतिगृह क्रमांक ०२ ची दूरवस्था झाली असून अशा परिस्थितीतही आदिवासींच्या मुलांना शिक्षण घ्यावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन आदिवासींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता कोट्यावधी रु. खर्च करते परंतु आदिवासी महामंडळाच्या योजना केवळ कागदावरच राहत असल्याने या समाजावर अन्याय होत आहे हे खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली व करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१०-०६-२०१६) :(१) आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, हिंगोली, क्र.२ येथील भाडयाच्या इमारतीत काही प्रमाणात असुविधा होत्या. तथापि, सदर वसतीगृह दि.१४.०१.२०१५ पासून नवीन शासकीय इमारतीत स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. तेथे विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधा पुरविण्यात येतात.

(२) हे खरे नाही.

आदिवासी महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ आदिवासींना देण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ (जि.ठाणे) शहरातील एमआयडीसीमध्ये भरारी पथकाची कमतरता असल्याबाबत

(२) ७९२६ (०९-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सदा सरवणकर (माहिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) शहरातील औद्योगिक पट्टयात असलेल्या आनंदनगर, चिखलोली, मोरीवली आणि वडोल या परिसरातील ४ एम.आय.डी.सी.मध्ये भरारी पथकाची कमतरता असल्याने एम.आय.डी.सी.मध्ये केमीकल उत्पादन करणा-या उद्योगांवरील रासायनीयुक्त उपयुक्त नसलेले टाकाऊ रसायन अनधिकृतपणे टँकर चालक परिसराशेजारील नाल्यात टाकतात अशा तक्रारी एम.आय.डी.सी व्यवस्थापन व पर्यावरण खात्याकडे तेथील नागरिकांनी वारंवार केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाकाऊ रसायन नाल्यात सोडल्याने परिसरातील हवामान व नाल्यात सोडण्यात आलेले टाकाऊ रसायन पुढे नदीला नाला मिळत असल्याने दुषीत व विषारी पाणी पिऊन ग्रामस्थांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याने सदर टँकर चालक व उद्योग व्यवस्थापक यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) :(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अथवा प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियम मंडळ, कल्याण यांच्याकडे अशा प्रकारच्या तक्रारी स्थानिक नागरिकांकडून प्राप्त झालेल्या नाहीत. तथापि, दिनांक २९/११/२०१४ रोजी अंबरनाथ पोलीसांकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या स्थानिक कार्यालयास रसायन टँकरद्वारे वडोलगाव येथे घातक रसायन सोडल्याची तक्रार प्राप्त झाली होती.

(२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कल्याण यांच्यातर्फे दिनांक २९/११/२०१४ रोजी अंबरनाथ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविला असून दोषी उद्योगाना उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच टँकर चालक व मालक यांच्यावर पोलीसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला असून खटला चालू आहे.संबंधित उद्योगाकडून घातक रसायने अवैधरित्या सोडल्याबाबत घातक घनकचरा नियम, २००८ नुसार दंडात्मक रक्कम वसूल करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्रिय प्रदूषण नियंत्रक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. अतिरिक्त पोलीस आयुक्त, कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली सदर घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता समिती गठीत करण्यात आली आहे. अशा घटना पुन्हा घडू नये याकरिता शासन गांभीर्याने कारवाई करीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी-परुळे विमानतळासाठी संपादित केलेल्या जमिनीबाबत

(३) ८००७ (०४-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी-परुळे विमानतळासाठी संपादित केलेल्या २७२ हेक्टर क्षेत्राची हद्द निश्चित करतांना हद्दीवरील शेतक-यांना शिल्लक क्षेत्र न दाखविताच १९९८ च्या मोजणीप्रमाणे शेतक-यांना अंधारात ठेवून मोजणीला सुरुवात करुन शेतक-यांची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हद्द निश्चित करतांना ३०७ हेक्टर जमिनीला मार्किंग करुन अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले, तद् नुसार शेतक-यांना शिल्लक क्षेत्र दाखवून देण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१४-०६-२०१६) : (१) व (२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील चिपी परुळे विमानतळासाठी मौजे चिपी, कर्ली परुळे ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदूर्ग येथील खाजगी २७१.८६ हे.आर व सरकारी ३.३९ हे.आर. असे एकूण २७५.२५ हे.आर. क्षेत्र संपादित करण्यात आले असून महामंडळाने ११.२३ हे.आर. अतिरिक्त खाजगी क्षेत्र खरेदी केले आहे. तथापि, भूमी बचाव कृती समिती, परुळे चिपी यांनी उच्च न्यायालयात दावा दाखल केल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने दिनांक ६/८/२०१४ रोजी सदर क्षेत्राची पुन:श्च मोजणी करण्याचे आदेश भूमी अभिलेख, वेंगुर्ला यांना दिल्यानुसार दिनांक १५/१२/२०१४ ते १९/१२/२०१४ या कालावधीत मोजणी करुन दिनांक ६/१/२०१५ रोजी नकाशासहित अहवाल मा.उच्च न्यायालयाला सादर करण्यात आला. त्यानुसार दिनांक १०/९/१९९८ रोजी विमानतळासाठी संपादन केलेल्या खाजगी २७१.८६ हे.आर. व शासकीय ३.३९ हे.आर. क्षेत्राची भूसंपादन मोजणी बरोबर असून ३०७ हे.आर. जमिनीवर मार्कींग करुन अतिकमण केलेले नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे शेतकऱ्यांना उर्वरित क्षेत्र दाखवून देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील औद्योगिक वसाहतीमधील कारखाने पुरेशा पाणी पुरवठ्या अभावी बंद पडल्याबाबत

(४) १६६९९ (३१-०७-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील कायम दुष्काळी भागात रोजगार निर्मितीसाठी कार्यान्वीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीमधील काही कारखाने पुरेशा पाणी पुरवठ्या अभावी बंद पडले असून काही कारखाने बंद पडण्याच्या मार्गावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे बेरोजगारी वाढणार असल्याने सदर कारखान्यांना त्यांच्या दैनंदिन कामासाठी पुरेसा पाणी पुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) व (२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मंगळवेढा औद्योगिक क्षेत्राकरिता कायमस्वरुपी पाणीपुरवठयासाठी बठाण बंधाऱ्यातून, पाणी आरक्षणासाठी कार्यकारी अभियंता, सांगली भीमा पाटबंधारे खात्याकडे प्रस्ताव सादर केला आहे. परंतु अद्याप पाणी आरक्षण प्राप्त झालेले नाही. तसेच औद्योगिक क्षेत्रात सुरु असलेल्या तीन उद्योग घटकांची पाण्याची मागणी नगण्य असून ते सुरळित सुरु आहेत. या क्षेत्रातील ४८.६० हेक्टर क्षेत्र WELSPUN या औद्योगिक घटकास सोलर सिस्टीमसाठी वाटप करण्यात आले असून त्याची पाण्याची गरज नगण्य आहे. उर्वरित क्षेत्रासाठी बठाण बंधाऱ्यातून पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणे परवडणारे नसल्याने तात्पुरत्या स्वरुपात पाणीपुरवठा करण्यासाठी मंगळवेढा नगरपरिषदेकडून एका इंचाऐवजी तीन इंचाचे पाणी कनेक्शन उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आली होती. परंतु त्यास नगरपरिषदेचा प्रतिसाद मिळाला नाही.

महामंडळाने औद्योगिक क्षेत्रात विंधन विहीर घेतली आहे परंतु त्यास पाणी उपलब्ध झाले नाही. महामंडळाकडून ५० घ.मी.क्षमतेची उंचावरील पाण्याची टाकी व २०० घ.मीटरचे पंप व पंप हाऊस बांधण्यात आले आहे. तसेच महामंडळाने ,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सोलापूर यांच्याकडे मंगळवेढा औद्योगिक क्षेत्रासाठी ५०० घ.मी.प्रतिदिन पाणी आरक्षण आरक्षित करण्याची विनंती केली आहे व महामंडळाने २.१५ कि.मी.लांबीचे डांबरी रस्ते बांधले असून भूखंडाना पाणी पुरवठा करण्यासाठी रस्त्यांच्या कडेने जलवाहिन्यादेखील टाकण्यात आल्या आहेत.

(३) वरील कारणांमुळे सुरळीत पाणी पुरवठा करण्यास अडथळा निर्माण होत आहे.

पंढरपुर (जि.सोलापूर) येथे एमआयडीसी स्थापना करण्याबाबत

(५) १६७०० (३१-०७-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपुर (जि.सोलापूर) येथे मुबलक पाणी, जमीन, कुशल कामगार व अभियंते तसेच रेल्वे व रस्त्यांची योग्य सुविधा व एमआयडीसीची आवश्यकता असतानाही उक्त परिसरात अद्यापी एमआयडीसी झाली नसल्यामुळे सुशिक्षीत बेरोजगार नोकरीपासून वंचित राहत असल्याचे माहे एप्रिल-मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) :(१) व (२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पंढरपूर तालुक्यातील पंढरपूर - सातारा मार्गावरील मौजे भाळवणी येथील ५५९.०४ हेक्टर आर खाजगी व १.३८ हेक्टर सरकारी असे एकूण ५६०.४२ हेक्टर आर क्षेत्रास महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ नुसार प्रकरण ६च्या तरतूदी लागू करण्यासंबंधीच्या प्रस्तावास उच्चाधिकार समितीच्या दिनांक ५/१२/२०१३ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. तथापि पाण्याचे आरक्षण प्राप्त झाल्यानंतर पांच वर्षात भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करावी असे देखिल समितीने निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने उप अभियंता, मऔविम यानीं पाण्याच्या आरक्षणासाठी कार्यकारी अभियंता, भीमा पाटबंधारे विभाग (पंढरपूर) यांना प्रस्ताव सादर केला असून त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीमधील भूखंडावर उद्योग उभारणी करण्यात न आल्याबाबत

(६) १६८४१ (३१-०७-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील नांदगांव पेठ, तिवसा व इतर एम.आय.डी.सी मधील औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योजकांना उद्योगाकरिता प्लॉट मंजूर केल्यानंतर १० ते १५ वर्षानंतरही उद्योगाची उभारणी करता येत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयानुसार ज्या उद्योजकांनी उद्योग उभारला नाही व त्यांचा उद्योगाकरिता असलेला प्लॉट विनावापर पडून आहे अशा उद्योजकांच्या ताब्यातील प्लॉट शासनाने ताब्यात घेण्याबाबत तसेच ज्या उद्योजकांना उद्योग सुरु करावयाचा आहे त्यांना प्लॉट उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) व (२) हे खरे नाही.

अमरावती विभागाअंतर्गत औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अमरावती-नागपूर राज्य महामार्गावर ११७.२२ हे.आर सरकारी व २६९२.५६ हे.आर खाजगी अशी एकूण २८०९.७८ हे.आर.जमिन संपादित केली आहे. त्यापैकी, प्रथम टप्प्यात १५४८.६० हे.आर जागा विकसित करुन त्यामध्ये ५४२ औद्योगिक व २२ व्यापारी भूखंडांचे आरेखन करण्यात आले असून त्यापैकी ५१० औद्योगिक व ३ व्यापारी भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. सदर औद्योगिक क्षेत्रामध्ये ५०० हे.आर जागेवर टेक्सटाईल पार्क नियोजित असून त्यामध्ये ३८ भूखंडांचे आरेखन करण्यात आलेले आहे.

ज्या भूखंडधारकांनी करारनाम्यात नमूद केलेल्या अटीनुसार विहीत कालावधीत भूखंडाचा विकास केलेला नाही. अशा भूखंडधारकांना भूखंड परत घेण्याची नोटीस देण्यात आली असून आतापर्यंत राज्यातील एकूण औद्योगिक क्षेत्रातील ११२६ इतके भूखंड ताब्यात घेण्यात आले असून गरजु उद्योजकांना भूखंड वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे कौडगाव (ता.जि.उस्मानाबाद) येथे औद्योगिक क्षेत्र प्रस्थापित करण्याबाबत

(७) २२४१२ (३१-०७-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कौडगाव (ता.जि.उस्मानाबाद) येथील M.I.D.C. औद्योगिक वसाहतीत २५०० एकरावर औद्योगिकक्षेत्र प्रस्थापित करुन तेथे महाजनकोचा ५० मे. वॅ चा सौरउर्जेवर आधारित वीज निर्मिती प्रकल्प सुरु करण्याची घोषणा सरकारने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनुषंगाने प्रकल्प सुरु होण्यासाठी निविदा काढण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निविदा कधीपर्यंत अंतिम होतील तसेच, निविदा न काढण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, हे प्रक्रिया पूर्ण करुन सदर प्रकल्प लवकर कार्यान्वित करण्यासाठी शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (०७-०६-२०१६) : (१) हे अंशत: खरे आहे. महामंडळाने उस्मानाबाद जिल्हातील मौजे कोडगाव येथे औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी टप्पा क्र. १ व २ मधील एकूण ५४७.०५ हे. आर. क्षेत्राचे भूसंपादन केले असून त्यापैकी टप्पा क्र. १ मधून मे. महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी लि. यांना ५० मेगावॅट सोलर पॉवर एनर्जी निर्मितीकरीता ११८.३२ हे. आर. क्षेत्राचे वाटप केलेले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) राज्य शासनाचे नवीन ऊर्जा धोरण-२०१५ जाहिर होणार होते त्यामुळे दिनांक २३/४/२०१५ रोजी निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली होती. तथापि, आता शासनाचे सौर ऊर्जा धोरण-२०१५ दिनांक २०/७/२०१५ रोजी जाहिर झाल्यामुळे राज्यात सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी निविदा प्रक्रिया लवकरच सुरु करण्यात येणार आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सेझ प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी ताब्यात घेण्यात आल्याबाबत

(८) २२७८८ (०६-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सेझ प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी ताब्यात घेण्यात आल्या परंतु गेल्या ५ वर्षात सेझ प्रकल्प प्रत्यक्षात उभे न राहिल्यामुळे जमिनींच्या ७/१२ वरील सेझ प्रकल्पाची नोंद व शिक्के कमी करण्यात येऊन सदरहू जमिनी मुळ शेतकऱ्यांना देण्यात यावी अशी मागणी राज्यातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी निवेदने देऊन तसेच विविध जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे काढून नाराजी व्यक्त केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) ज्या प्रकल्पासाठी सेझ जमिनी संपादित करण्यात आल्या परंतू अद्यापही तेथे उद्योग सुरू न करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) असल्यास आतापर्यंत प्रत्यक्षात किती ठिकाणी सेझ प्रकल्प सुरू झाले आहेत त्यांची नावे व ठिकाण कोणती आहेत

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (२७-०६-२०१६) :(१), (२) व (३)

१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील प्राप्त अहवालानुसार खेड विशेष आर्थिक क्षेत्राची प्रत्यक्ष कार्यवाही ही सन २००६ पासून सुरु झालेली असून त्यामध्ये खेड तालुक्यातील १५ गावे व शिरुर तालुक्यातील २ गावामधील एकूण खाजगी क्षेत्र ७०४४.७५.१० हे.आर. व शासकीय क्षेत्र ७०१.१३ हे. आर असे एकूण क्षेत्र ७७४५.८८.१० हे. आर या क्षेत्रास प्रकरण ६ ची अधिसूचना लागू करण्यात आलेली आहे.

खेड विशेष आर्थिक क्षेत्राकरिता एकूण खाजगी क्षेत्र ७७०४.७५.१० हे.आर. व शासकीय क्षेत्र ७०१.१३ हे.आर. असे एकूण ७७४५.८८.१० हे. आर. क्षेत्रास प्रकरण ६ च्या तरतूदी लागू करण्यात आलेल्या असून त्यापैकी १७०५.६१.१० क्षेत्र संपादित केले असून उर्वरित गावांमधील भूधारकांच्या विरोधामुळे सदरचे शिल्लक क्षेत्र ६०४०.२६.३ हे.आर. पैकी क्षेत्र ९०८.५६ हे.आर. क्षेत्र पूर्वी वगळलेले असून आज अखेर शिल्लक क्षेत्र ५०१२.९३ हे.आर. वगळण्यासाठी ०६/५/२०१५ रोजी प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्पष्ट केले आहे.

२) कार्ला विशेष आर्थिक क्षेत्राकरिता प्रकरण ६ ची अधिसूचना ११८७.४५.१४ हे.आर. क्षेत्र सन २००६ मध्ये अधिसूचित करण्यात आले या क्षेत्रात महिंद्रा ॲण्ड महिंद्रा यांचा SEZ प्रस्तावित होता. तो कालांतराने रद्द झाला. सद्य:स्थितीत सदरचे अधिसूचित क्षेत्र वगळण्याबाबत प्रस्ताव दिनांक ३०/०७/२०१५ रोजी शासनास सादर केला आहे.

३) खंडाळा टप्पा क्र.१ मधील अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रापैकी ६१.१२ हे.आर. क्षेत्र विशेष आर्थिक क्षेत्रातून वगळण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे.

४) फलटण येथील १०१.२५ हे.आर. अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रापैकी ४८.१७ हे . आर क्षेत्र विशेष आर्थिक क्षेत्रातून वगळण्याबाबत शासनात प्रस्ताव सादर केलेला आहे.

५) चिंचोली-काटी जि. सोलापूर येथील १०३ हे. आर क्षेत्रावर वस्त्रोद्योग विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यात केंद्र शासनाकडून मंजूरी देण्यात आली होती. सदर ठिकाणी क्षेत्र मागणी अभावी शासन स्तरावर सदर प्रस्ताव रद्द करुन औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित करण्यास व त्यास केंद्र शासनाकडील दिनांक २३/०३/२०११ च्या बैठकीत सदर विशेष आर्थिक क्षेत्राकरिता विशेष आर्थिक क्षेत्र कायदा/ नियमाअंतर्गत कर/ जकातीतील घेतलेली सूट / फायदे परत करण्याच्या अटीवर मंजूरी देण्यात आली आहे.

६) सिन्नर जि. नाशिक येथील २०२.९२ हे. आर क्षेत्र दिनांक ११/०७/२००९ रोजी वगळण्यात आले आहे. तसेच शासनाच्या आदेशाप्रमाणे केवळ संमतीदर्शक निवाडे झाले, अन्य जमिनी भूसंपादनाच्या प्रक्रियेमधून वगळण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर ज्या ज्या जमिनीवर भूसंपादनाचे गा.न.नं. ७/१२ व इतर हक्कात शिक्के मारले गेले होते. ते कमी करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार कार्यासन अधिकारी महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. एआरजी २८१०/५३/प्र.क्र.११/अ-३, दिनांक १८/०२/२०११ अन्वये शेरे कमी करणेबाबतची कार्यवाही करणेबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने पत्र क्र. साशा/भूसं ६/विआक्षे/७/१२ शेरे २०११, दि. २८/०२/२०११ अन्वये संबंधित भूसंपादन अधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे.

४) राज्यात आत्तापर्यंत २५ विशेष आर्थिक प्रकल्प सुरु आहेत. त्यांची नावे व ठिकाण यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

Sr.No.	SEZ Name	Location of SEZ
१	Multi Product (Electronics Gems & Jewellery)	DC SEEPZ SEZ Mumbai
२	IT/ITES	Powai, Mumbai
३	IT/ITES	Taluka Havali, Dist. Pune
४	Pharma & Bioltechnlogy	२१२/२, off Soli Poonawala Road, Hadapsar,Pune
५	IT/ITES	Plot No. ३१, Rajiv Gandhi Infotech Park, Phase II, Hinjewadi Pune.

६	IT/ITES	Talwade Softwar Park, Dist.Pune
७	IT/ITES	S.No.२०९ Next to Satypuram Society, Pune-Saswad Road, Phursundi, pune
८	IT/ITES	Rajiv Gandhi Infotech Park, Ph.II, Village Mann, Taluka Mulshi, Dist.Pune.
९	IT/ITES	Rajiv Gandhi Infotech Park, Ph.III, Hinjewadi, Dist.Pune
१०	Electronic Hardware and Software Including Information technology enabled	Magarpatta City Village, Hadapsar, Taluka Haveli, Dist. Pune
११	IT/ITES	Plot No. २८, MIDC, Rajiv Gadhi Infotech Park, Hinjewadi, Phase II, Dist.Pune
१२	IT/ITES	Village Hinjewadi, Taluka Mulshi, Pune
१३	IT/ITES	Plot No.३ Rajiv Gandhi Infotech Park, Phase II, Hinjewadi, Taluka Mulshi Dist. Pune
१४	Multi Product	at Mihan. Dist.Nagpur
१५	Engineering & Electronics	Shendre Industrial Area, Dist.Aurangabad
१६	Power	Waora Growth Centre, Dist. Chandrapur
१७	IT/ITES	Kalwa TransThane Creek Industrial Area, MIDC Dist. Thane
१८	FTWZ	Village Sai, Taluka Panvel, Dist. Aurangabad

१९	Pharmaceuticals	Shendre Industrial Area, Dist. Aurangabad
२०	Multi Product (Electronics and Gems & Jewellry)	Pune
२१	IT/ITES	Thane
२२	IT/ITES	Village Kopari, Tal.Thane, Dist. Thane
२३	Engg	Satara
२४	Pharma	Nanded
२५	Engg sector	Satara

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाडा (जि.पालघर) तालुक्यातील उंबरोटे येथील आदिवासी वसतिगृहांच्या संकुलातील कामे अपुर्ण अवस्थेत असल्याबाबत

(९) २२९३२ (१९-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.पास्कल धनारे (डहाणू) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील उंबरोटे रस्त्यालगत नव्याने बांधलेल्या आदिवासी वसतिगृहाचे दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ रोजी उदघाटन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहाच्या संकुलातील बरीच कामे अपुर्ण अवस्थेत असल्याने सदर वसतिगृह वापराविना बंद स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अपुर्ण व निकृष्ट दर्जाचे काम ठेवणाऱ्या ठेकेदाराविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१३-०६-२०१६) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक ०१ सप्टेंबर, २०१५ पासून आदिवासी मुला-मुलीचे वसतीगृहातील विदयार्थी नविन वसतीगृह इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आलेले असून इमारतींचा वापर सुरु आहे.

(३) वाडा येथील बांधकाम पूर्ण झालेल्या तिनही वसतीगृहाची गुणवत्ता तपासणी करुन गुणवत्ता प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास जव्हार यांच्या मार्फत त्यांच्या दिनांक ०७.०६.२०१५ च्या पत्रान्वये दक्षता व गुण नियंत्रण प्रादेशिक प्रयोगशाळा तुर्भे नवी मुंबई यांना कळविण्यात आले आहे. सदर प्रकरणी दक्षता व गुण

नियंत्रण प्रादेशिक प्रयोगशाळा, तुर्भे नवीमुंबई तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, उपविभाग वाडा यांच्याकडे प्रकल्प स्तरावरुन पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील खांडसारी कारखान्याला नियमबाह्य अर्थसहाय वितरित करण्यात आल्याबाबत

(१०) २३७५० (३०-०७-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खांडसारी कारखान्याला अटींचे पालन न करताही रुपांतर आणि आधुनिकीकरणासाठी रु ४.८० कोटी नियमबाह्य अर्थसहाय वितरित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एखाद्या संस्थेला अर्थसहाय मंजूर करतांना त्या संस्थेला कर्ज देण्याची आवश्यकता, संस्थेचा अनुभव, जबाबदारी पार पाडण्याची क्षमता याचा विशेष अभ्यास करण्याची अट बॉम्बे वित्तीय नियमांनी (बीएफआरएस) यांनी घातली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अटींचे पालन करुन किती कारखान्यांना अर्थसहाय देण्यात आले आहे?

श्री. राजकुमार बडोले (२१-०६-२०१६) :(१) अंशत: खरे आहे,
(२) मुंबई वित्तीय नियम-१९५९ मध्ये सहकारी संस्थांना अर्थसहाय्य मंजुर करणे, याबाबत कोठेही उल्लेख आढळून येत नाही. तथापी मुंबई वित्तीय नियम- १९५९ मधील नियम ३७८ मध्ये वित्तीय औचित्याचे उल्लंघन करणारी अग्रिमे/कर्जे मंजुर करण्यात येऊ नयेत असा उल्लेख करण्यात आलेला आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आदिवासी विकास विभागातील रोजंदारी कर्मचा-यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत

(११) २७२२५ (३१-०७-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी विकास विभागातील सर्व रोजंदारी कर्मचा-यांना शासन सेवेत सामावून घेण्यासाठी शासनपातळीवर धोरणात्मक निर्णय घेण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१३-०६-२०१६) : (१), (२) व (३) सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक दिनांक २५/८/२००५ नूसार मा. सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या नियमित न करण्याबाबत दिलेल्या निर्णयाच्या बाबी निदर्शनास आणून दिल्या आहेत. तरी प्रस्तुत प्रकरणी याविषयी विधी व न्याय विभागामार्फत अभिप्राय घेण्यात आले असून त्यानुसार आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडून सुधारित प्रस्ताव प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सरु आहे. तसेच प्रकरणी विविध विभागांमध्ये अशा प्रकारच्या नियुक्त्या करण्यात आल्याने असे किती कर्मचारी कार्यरत आहेत त्यांचा एकत्रित तपशिल घेवून सामान्य प्रशासन विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

राज्यात सफाई कामगारांना डोक्यावरुन मैला वाहून नेण्याची प्रथा बंद करण्याबाबत

(१२) २८२१३ (०५-११-२०१५). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सफाई कामगाराना डोक्यावरुन मैला वाहून न्यावा लागत असल्याने ही प्रथा बंद करण्याबाबत शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयानुसार गलिच्छ वस्तीमध्ये सर्व्हे करुन सदरची प्रथा बंद करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, सदर योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२१-०६-२०१६) : (१) अंशत: खरे आहे, तथापि राज्यात डोक्यावरुन मैला वाहून नेण्याच्या पध्दतीचे निर्मुलन मार्च, २०१६ पर्यत करणार असल्याची मा. मुख्यमंत्री यांनी घोषणा केलेली नसून की रिझल्ट एरिया (KRA) च्या बैठकीच्या वेळी मा. मुख्यमंत्री यांनी संबंधित विभागांना सदर प्रकरणी निर्देश दिले होते.
(२) व (३) हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे पुर्नवसन करण्याबाबतचा अधिनियम २०१३ च्या अनुषंगाने असे काम करणाऱ्या कामगारांचे फेरसर्व्हेक्षण करुन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबतची कार्यवाही करण्याच्या दिनांक १६/१०/२०१४ व दिनांक ०७/०८/२०१५ च्या शासन निर्णयान्वये सुचना सर्व महानगरपालिका, जिल्हापरिषदा, जिल्हाधिकारी तसेच नगरविकास विभाग व व ग्रामविकास विभागास दिलेल्या आहेत

कोल्हापूर जिल्ह्यातील नियोजित नामदेवराव खोत वि.का.स सेवा संस्था मर्या. कडवे पैकी वरीलगाव ता.शाहुवाडी या संस्थेने दाखवलेल्या २०० सभासदांपैकी ५० टक्के सभासद दुसऱ्या गावातील असलेबाबत

(१३) २९०३५ (२२-१२-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील नियोजित नामदेवराव खोत वि.का.स सेवा संस्था मर्या. कडवे पैकी वरीलगाव ता.शाहुवाडी या संस्थेच्या नोंदणी प्रस्तावातील अनेक कागदपत्रे बोगस असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास प्रस्तावातील सभासदांचा माहिती तक्ता पाहता २०० सभासद असल्याचे दिसून येते परंतु तक्त्यातील सर्व कॉलमची पूर्तता केलेली नसून सर्व सभासदांचा व्यवसाय शेती असा नमूद केला आहे परंतु अनेक महिला सभासद गृहिणी आहेत त्यांचा ही व्यवसाय शेती असा नमूद केला आहे हे खरे आहे काय?

(३) असल्यास २०० पैकी ५० टक्के सभासाद कडवे पैकी वरील गावातील नसून ते कडवे, लाळेवाडी येथील असताना त्यांचे पत्ते व क.म. क्षेत्र हे कडवे पैकी वरील गाव असे खोटे लिहिलेले आहे हे खरे आहे काय?

(४) असल्यास प्रवर्तक मंडळात १३ सदस्य असून ते वेगवेगळ्या कुटुंबातील असल्याचा तलाठी यांनी खोटा दाखले दिलेलें आहे तसेच ७ प्रवर्तक हे कडवे व लाळेवाडी या गावातील असताना ते प्रस्तावामध्ये रा. कडवे पैकी वरीलगाव या नावाने नमूद आहेत हे खरे आहे काय?

(५) असल्यास अशा प्रकारे बोगस कागदपत्रे जोडून प्रस्ताव सादर करणाऱ्या प्रवर्तक मंडळावर शासन फौजदारी गुन्हे दाखल करणार का,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१६) : (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) नाही, हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या आश्रमशाळांना जोडून कनिष्ठ महाविद्यालये सुरु करण्याबाबत

(१४) ३०१९७ (२०-०१-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २००८ मध्ये राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या आश्रमशाळांना जोडून कनिष्ठ महाविद्यालये सुरु करण्याची परवानगी दिल्यानंतर वेतन अनुदान देण्यास

केलेली सुरुवात सन २०१४-१५ पासून अचानक बंद केल्याने शेकडो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपासमार होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर संस्थांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे थकित वेतन अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१७-०६-२०१६) : (१), (२) व (३) १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांच्या पदांना उच्चस्तरीय समितीची मान्यता नसताना व त्यासाठी कोणतीही वित्तीय तरतूद केलेली नसताना क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांनी २५ ते ७५% अनुदान वाटप केल्याची बाब निदर्शनास आली. यास्तव या आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन थांबविण्यात आले आहे.

उच्चाधिकार समितीने उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या माहितीसह व मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर फेर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

हिंगोली जिल्हयास ६० टक्के फेर कर्ज देण्याबाबत

(१५) ३०२०७ (१५-०१-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वित्त विभागाच्या वतीने जिल्हा मध्यवर्ती बँकाना पिक कर्ज रुपांतरासाठी नॉबार्डच्या वतीने ६० टक्के फेर कर्जासाठी शासनाने निर्णय दिनांक १२ जुलै, २०१५ रोजी घेण्यात आल्याप्रमाणे राज्यातील केवळ सात जिल्हयांनाच लाभ देण्यात आला तसेच हिंगोली जिल्हयांची पैसेवारी ५० टक्यांच्या आत असूनही हिंगोली जिल्हयाला वगळण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली जिल्हयास ६० टक्के फेर कर्ज देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकात पाटील (०९-०६-२०१६) : (१) हिंगोली जिल्हयामध्ये खरीप हंगाम २०१४ मध्ये ६२,३४२ सभासदांना पीककर्जवाटप करण्यात आले होते. त्यापैकी ५३२५५ सभासदांना पीककर्जवाटप करण्यात आले होते. त्यापैकी ५३२५५ सभासदाना खरीप हंगाम २०१५ मध्ये पीक कर्ज वसुल होऊन पुन:श्च पीक कर्जवाटप झाले आहे तसेच उर्वरित कर्जदार सभासदाचे पीकदर्जाचे रुपांतरण करणेसाठी विविध कार्यकारी सेवा संस्थाकडून जिल्हा बँकेस प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे जिल्हयातील शेतकरी सभासदांच्या पीककर्जाचे रुपांतरण झालेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यात समाजकल्याण विभागामार्फत देण्यात येणारी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीची रक्कम गत पाच वर्षांपासून दिली नसल्याबाबत

(१६) ३१३६० (२३-१२-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात समाजकल्याण विभागामार्फत देण्यात येणारी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीची रक्कम गत पाच वर्षांपासून दिली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिष्यवृत्तीची रक्कम थकित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर थकित शिष्यवृत्तीची रक्कम देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२१-०६-२०१६) :(१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील गृहनिर्माण सहकारी संस्थांची यादी सादर करण्याबाबत

(१७) ३१७७८ (२२-१२-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक गृहनिर्माण सहकारी संस्थाच्या निवडणुका वर्षानुवर्षे घेतले जात नाहीत, अशा संस्थांची यादी सादर करण्यास राज्य शासनाच्या विभागाला प्राधिकरणाकडून आदेश देण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यादी प्राप्त झाल्यावर अशा गृहनिर्माण संस्थांच्या लगेचच निवडणुका घेतल्या जातील असे नमूद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत किती सोसायट्यांच्या याद्या शासनाकडून प्राधिकरणास देण्यात आल्या आहेत व त्यानुसार सोसायट्यांच्या किती निवडणुका घेण्यात आल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१६) : (१) व (२) हे खरे नाही. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मागविलेली सर्व संस्थांची ई-१ नमुन्यातील माहितीनुसार आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सी बी-१० मधील तरतूदीनुसार पात्र संस्थांच्या निवडणुका घेणेबाबत कार्यवाही केली जाते.

(३) शासनाकडून प्राधिकरणास कोणत्याही संस्थांच्या याद्या देण्यात येत नाहीत. तथापि, उपरोक्त नियमांना अनुसरुन नियुक्त केलेल्या जिल्हा/तालुका/वॉर्ड सहाकरी निवडणूक अधिकाऱ्यांकडून ई-१ नमुन्यातील "ड" वर्ग सहकारी संस्थांची दि. ३१.१२.२०१५ या कालावधीपर्यंत सर्व प्रकारच्या एकूण २५०५० इतक्या संस्थांची माहिती प्रधिकरणास प्राप्त झाली आहे. त्यानुसार सोसायटीच्या निवडणूका घेण्यात आल्या व दि. ३१.१२.२०१५ अखेर सर्व प्रकरच्या "ड" वर्गातील एकूण १९५५० सहकारी संस्थांच्या निवडणूका पूर्ण झालेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरण्याबाबत

(१८) ३१९९६ (१८-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यशासनाने समाजकल्याण विभागाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी ऑनलाइन शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी प्रथमच "ओटीपी" (वन टाईम पासवर्ड) मागण्याची पध्दत सुरु केली मात्र ओटीपी त्वरीत मिळत नसल्यामुळे शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी त्रस्त झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील लाखो विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागात इंटरनेट ची सुविधा कमी असल्याने व विद्यार्थ्यांकडे संगणक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यामुळे ज्या शाळा महाविद्यालयाचे विद्यार्थी असतील त्या संस्थानी शिष्यवृत्तीचे अर्ज विद्यार्थ्यांकडून भरुन घेण्याचे बंधन घालण्यात यावे, यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय अहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२१-०६-२०१६) :(१) होय.
(२) नाही.
(३) अंशत: खरे आहे.
(४) शालेय विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज मुख्याध्यापकांनी भरावेत अशा सूचना असून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्यासाठी महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना मदत करावी, अशा सूचना आयुक्तालयामार्फत वेळोवेळी बैठकीत देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

दि. महाराष्ट्र स्टेट को.ऑप. हाऊसिंग फायनान्स कॉर्पो लि. मुंबई संस्थेत संचालक मंडळाने आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

(१९) ३३५६७ (२२-१२-२०१५). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दि. महाराष्ट्र स्टेट को.ऑप. हाऊसिंग फायनान्स कॉर्पो लि. मुंबई संस्थेत संचालक मंडळाने केलेला आर्थिक गैरव्यवहार, भ्रष्टाचार व संस्थेवर उदभवलेले आर्थिक संकट याबाबतचे उच्च पातळीवर चौकशी करुन दोषी व्यक्तींविरुध्द कारवाई करण्यासंबंधी तसेच संस्थेवर प्रशासन नेमण्याबाबत धुळयाचे लोकप्रतिनिधींनी यांनी दि. १९/०१/२०१५ रोजी व सुमारास मा.सहकार मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच संस्थेवर प्रशासन नेमण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१०-०६-२०१६) : (१) होय, हे खरे आहे.

(२) कार्याध्यक्ष हाऊसफिन एम्प्लाईज युनियन (महाराष्ट्र राज्य) मुंबई यांनी केलेल्या तक्रार अर्जातील मुद्दे व मा. श्री. अनिल (अण्णा) गोटे यांचे तक्रारीतील मुद्दे सारखेच असल्यामुळे व श्री. दिनकर देसाई यांचे तक्रारीनुसार कार्यवाही यापूर्वीच चालू असल्यामुळे वेगळी कार्यवाही करणे अपेक्षित नाही. तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी आदेश देण्यात आले. चौकशी अधिकारी यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वयेचे आदेश निर्गमित करण्यात आले. त्याप्रमाणे प्रधिकृत अधिकारी यांनी अहवाल सादर केला होता. तथापि, सदरचा चौकशी अहवाल स्वीकारार्ह नसल्याने पुन्हा कलम ८८ अन्वये चोकशी करणेसाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांची नियुक्त करण्यात आली आहे. चौकशी अहवाल प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही करणेत येत आहे. संचालक मंडळाची मुदत दिनांक २०.६.२०११ रोजी संपली होती. तथापि संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती न करणेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे याचिका क्र. ९८७/२०१६ दाखल झाली असून त्याअन्वये दिनांक १५.२.२०१६ पर्यत प्रशासक नियुक्तीची कार्यवाही न करणेबाबतच्या सुचना मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आहेत. त्यामुळे प्रशासक नियुक्तीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

जालना जिल्ह्यासह राज्यातील शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावरील कर्जाचा बोजा कमी करण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेने दिल्याबाबत

(२०) ३३६०७ (२३-१२-२०१६). श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यासह राज्यातील बहुतांशी जिल्ह्यातील पाच ते दहा एकरच्या आत शेती असलेल्या शेतकऱ्यांनी एक लाख रुपयांच्या आत पीक कर्ज घेतलेले आहे अशा शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावरील कर्जाचा बोजा कमी करण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेने गेल्या दीड वर्षापूर्वीच राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध राष्ट्रीयकृत बँकाच्या वेगवेगळया शाळेच्या शाखाधिकऱ्यांनी पीक कर्जाचा बोजा कमी करण्याची कार्यवाही करण्यास टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात जिल्ह्याचे पालकमंत्री यांनीही बँकाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर वारंवार बैठका घेऊनही कोणतीच कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनान चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले. त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१६) :(१) नाही, परंतु दिनांक १८.०६.२०१० च्या RBI च्या परिपत्रकाप्रमाणे रु. १ लाखा पर्यतच्या कृषी कर्जाकरीता (ज्यात पीक कर्जाचा देखील समावेश होतो) अशा कर्जातून निर्माण होत असलेल्या मालमत्तेशिवाय इतर कुठलेही सहतारण घेण्यात येऊन नये असे निर्देशित करण्यात आले आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) पालकमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बँकर्सच्या सभेत जिल्ह्यातील सर्व व्यापारी/ग्रामीण बँक शाखाधिकाऱ्यांना वरीलप्रमाणे प्रत्यक्ष देण्यात आल्या आहेत,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर येथील विविध बँकांचे थकीत कर्ज वसुलीबाबत

(२१) ३३६८५ (१२-१२-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील विविध बँकांची १५० कोटीची थकीत कर्जे वांरवार नोटीसा बजावूनही, परतफेड न करणा-या थकबाकीदार तसेच जमीनदारांच्या मालमत्ता ताब्यात घेण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार संबंधित तालुक्यातील तहसिलदारांनी अद्यापपर्यंत किती व कोणत्या थकीत कर्जदार व जमीनदार यांच्या मालमत्ता जप्त केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार संबंधित तालुक्यातील तहसिलदार यांचेकडून ८४ थकबाकीदारांवर कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्दभवत नाही.

जांब बु. (ता.मुखेड,जि.नांदेड) येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या मालकीची जागा हडप करणाऱ्याविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत

(२२) ३३९५४ (२२-१२-२०१५). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)जांब बु. (ता.मुखेड,जि.नांदेड) येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या मालकीची जागा हडप करणाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी माजी चेअरमन यांनी माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा पोलीस अधिकक्षकांकडे निवेदनाद्वारे केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) श्री. संजय बाबुराव यरपुरवाड, जांब बु. ता. मुखेड यांच्या प्राप्त निवेदनानुसार चौकशी करुन संस्थेला अतिक्रमण काढणे बाबत संस्थेस दिनांक ०६.०६.२०१५ व दिनांक ०६.११.२०१५ रोजी लेखी सुचना दिलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील तोट्यात असलेल्या तब्बल ९६५ विकास सेवा संस्थांबाबत

(२३) ३४१९४ (२२-१२-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पीक कर्जाचा कमी झालेला नफा, साखर कारखान्यांकडून वसूली न झाल्याने कोल्हापूर जिल्ह्यातील तब्बल ९६५ विकास सेवा संस्था तोट्यात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्था तोट्यात जाण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या संस्थांना उर्जितावस्थेत आणण्याकरिता शासनाने कोणती पावले उचलली आहेत वा उचलणार आहेत,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१६) :(१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) विकास सेवा सहकारी कृषि संस्था तोट्यात जाण्याची सर्वसाधारण खालील कारणे आहेत.

१. अपुरे संसाधन व परावलंबन
२. कर्जवसुलीचे प्रमाण असमाधानकारक असणे.
३. अनुत्पादक जिंदगीचे वाढते प्रमाण.
४. एक महसूली गावात एकापेक्षा जास्त कृषि पतसंस्था त्यामुळे व्यवस्थापन खर्च जास्त
५. पीक कर्जावाटपावरील कमी झालेला व्याज दुरावा.

(३) याबाबत खालील उपायोजना करण्यात येत आहेत.

१.एकाच गावात नवीन संस्था नोंदणीस दि. २३.०९.२०१३ च्या शासन निर्णयानुसार प्रतिबंध.
२. विकास सेवा संस्थांना व्यवसाय विकास आराखड्याची अंमलबजावणी कारणे.
३.दि. ०६.०९.२०१४ च्या शासन निर्णयानुसार पीक कर्ज पुरवठ्याच्या प्रमाणात संस्थांना अर्थसहाय्य करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापुर जिल्ह्यातील मट्रीकोत्तर मागासवर्गीय विध्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

(२४) ३४४१३ (२३-१२-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापुर जिल्ह्यातील मागासवर्गीय मट्रीकोत्तर विध्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती वाटपाचा ठेका पुणे येथील मास्केट कंपनीला देण्यात आला होता काय,
(२) असल्यास या शिष्यवृत्ती वाटपामध्ये अपहार झाल्याची तक्रार माहे जुलै २०१५ मध्ये अगर त्या सुमारास सोलापुर येथील सदर बझार पोलिस ठाण्यास दिली आहे काय,
(३) असल्यास या गुन्ह्याच्या तपासामध्ये काय निष्पन्न झाले आहे,
(४) यातील किती आरोपींना अटक करण्यात आली आहे ?

श्री. राजकुमार बडोले (२१-०६-२०१६) :(१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.
(४) सदर प्रकरणी ३३ आरोपींना अटक करण्यात आलेली होती.

नांदेड जिल्ह्यातील इस्लापूर परिसरातील शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज बँकेकडून मिळवून देण्याबाबत

(२५) ३४५७९ (१५-०१-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील इस्लापूर परिसरातील गावातील २५ शेतकऱ्यांनी नवीन पीक कर्ज देण्यासाठी पुर्ण फाईल तयार करुन पीक कर्ज देण्यासाठी इस्लामपूर येथील स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथील शाखा व्यवस्थापकाने नकार दिल्याने या शेतकऱ्यांनी बँकेसमोर आमरण उपोषणकेले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज सदर बँकेकडून मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१६) : (१) होय,

स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा इस्लापूर, ता. किनवट येथे कॉ. तुकाराम आडे, यांनी त्यांचे दोन ते तीन साथीदारांसह दिनांक २२.०९.२०१५ रोजी उपोषण सुरु केले होते. बँकेकडे दिलेल्या उपोषण नोटीस सोबत श्री. तुकाराम आडे व इतर ०२ जणांची यादी सोबत जोडली होती, परंतु केवळ तुकाराम आडे यांनीच अर्जावर स्वाक्षरी केली होती मात्र श्री. तुकाराम आडे यांना बँकेमार्फत उपोषणापुर्वीच रक्कम रुपये ९९,०००/- कर्ज दिनांक २८.०६.२०१५ रोजी वितरीत करण्यात आले होते.
(२) उर्वरीत २५ शेतकऱ्यांनी बँकेकडे कर्जासाठी अर्ज सादर केले नाहीत. त्यामुळे संबंधितांना कर्ज वितरीत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

परभणीसह मराठवाड्यातील जिल्हा बँकांवर पिक कर्ज रुपांतरनाची हमी देण्याबाबत

(२६) ३४७४७ (०९-०६-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा बँकांना पिक कर्ज रुपांतरानासाठी राज्य शासनाने विदर्भातील अकोला,वाशीम, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, व भंडारा आणि नाशिक या जिल्हा बँकांना राज्य शासनाने हमी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील एकाही जिल्हा बँकांचा पिक कर्ज रुपांतरणासाठी राज्य शासनाने हमी न देण्याची करणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२२-१२-२०१६) : (१) होय.

वित्त विभागाकडील दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना पीक कर्ज रुपांतरणासाठी नाबार्डच्या ६०% फेरकर्जास शासनाची हमी देण्याबाबत निर्णय निर्गमित झालेला आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १४/०१/२०१५ व १६/०४/२०१५ नूसार सन २०१४-१५ या वर्षात ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी जाहीर झालेल्या गावातील कर्जदार शेतकऱ्यांचे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थामार्फत पात्र सभासदांचे पीक कर्जाचे रुपांतरण करण्याबाबतचे प्रस्ताव औरंगाबाद विभागातील एकाही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे बँकेकडून रुपांतरणाची कार्यवाही करण्यात आलेली नाही. नाबार्डच्या फेरकर्जाबाबतचे प्रस्ताव बँकांनी शासनाकडे सादर केलेले नाहीत. त्यामुळे औरंगाबाद विभागातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना पीक कर्ज रुपांतरणासाठी नाबार्डच्या ६०% फेरकर्जास शासनाकडून हमी मिळालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

माळेगाव व मापारवाडी ग्रुप ग्रामपंचायत, ता. सिन्नर (जि. नाशिक)
करिता वाढीव नळ जोडणीस परवानगी मिळणेबाबत

(२७) ३५७५६ (२२-१२-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक क्षेत्र माळेगाव, ता. सिन्नर (जि. नाशिक) येथे औद्योगिक क्षेत्र विकसित झाल्याने तेथील लोकसंख्येमध्ये वाढ झालेली आहे. येथे सन १९९६ साली माळेगाव व मापारवाडी ग्रुप ग्रामपंचायतसाठी औद्योगिक विकास महामंडळाकडून ४० मी. मी. व्यासाची पिण्याच्या पाण्याची नळ जोडणी घेतलेली असून वाढत्या लोकसंख्येचा विचार करता सदर नळ जोडणी अपुरी पडत असल्याने वाढीव नळ जोडणीस परवानगी देण्यात यावी अशी मागणी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. उद्योगमंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ग्रामपंचायत माळेगाव यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई तसेच मा. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक, तसेच कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे वाढीव नळ जोडणीस परवानगी मिळणेबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१४-०६-२०१६) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सिन्नर औद्योगिक क्षेत्राकरिता १८ द.ल.ली. प्रतिदिन इतक्या क्षमतेची स्थायी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित असून आणखी ६ द.ल.ली प्रतिदिन क्षमता वाढविण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत माळेगाव-मापारवाडी ग्रुप ग्रामपंचायतीसाठी ४ नळ जोडणीदेण्यात आली असून सदर ग्रामपंचायत ३४२ घ.मी. प्रतिदिन पाणी घेत आहे. पळसे येथील पंपींग मशीनरी बदलण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून ७०० मीटर व्यासाची अशुध्द जलवाहिनी बदलण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे तसेच पाणीपुरवठा योजनेची क्षमता वाढविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर माळेगाव मापारवाडी ग्रुप ग्रामपंचायत वाढीव पाणीपुरवठा करणे शक्य होईल असे ग्रामपंचायतीला दिनांक २२/१२/२०१५ रोजी कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औद्योगिक क्षेत्र माळेगाव येथील भूखंड (Open Space No. १) प्राथमिक आरोग्य उपकेंद्र इमारत बांधण्यासाठी ग्रामपंचायतीस उपलब्ध करून देण्याबाबत

(२८) ३५७५७ (२२-१२-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक क्षेत्र माळेगाव, सिन्नर (जि. नाशिक) येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र इमारत बांधकामास सन २०१३-१४ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेली असून, जागेअभावी सदर काम बंद असल्याने औद्योगिक क्षेत्रातील भूखंड (Open Space No. १) प्राथमिक आरोग्य उपकेंद्र इमारत बांधण्यासाठी ग्रामपंचायतीस उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. उद्योगमंत्री यांना एका लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुशंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१४-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) सिन्नर (माळेगाव) औद्योगिक क्षेत्रातील मोकळी जागा प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी ग्रामपंचायतीस देण्यासंदर्भात महामंडळाने सरपंच ग्रामपंचायत, माळेगाव/मापारवाडी यांना दिनांक १९/१/२०१६ च्या पत्रान्वये सविस्तर अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले असून त्यांच्याकडून अहवाल प्राप्त होताच महामंडळाच्या धोरणानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शिक्षण संस्थांकडून विद्यार्थ्यांच्या सवलतीमध्ये अडथळा निर्माण होत असल्याबाबत

(२९) ३६६४३ (१८-०१-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागासवर्गीय विद्यार्थ्यंना उच्च शिक्षंण घेता यावे यासाठी राज्य घटनेत मेट्रिकोत्तर शिष्यवृत्ती देण्याची व्यवस्था केली असताना राज्यातील काही शिक्षण संस्थांकडून जीणीवपूर्वक विद्यार्थ्यांच्या सवलतीमध्ये आडकाठी निर्माण करुन गत वर्षात सुमारे ६ हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पासून वंचित राहावे लागल्याची बाब समाजकल्याण विभागाच्या आकडेवारी वरुन माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, अशा शिक्षण संस्थांच्या महाविद्यालयांवर कारवाई करुन सदरहू ६ हजार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (२१-०६-२०१६) : (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड शहरातील शेतकऱ्यांना सात राष्ट्रीयकृत बॅकांकडून पीककर्ज वाटप करण्यास दुर्लक्ष केले असल्याबाबत

(३०) ३६९१२ (२२-१२-२०१५). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड शहरातील शेतकऱ्यांना सात राष्ट्रीयकृत बॅकांकडून पीककर्ज वाटप करण्यास दुर्लक्ष केले असल्याबाबत ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरीप हंगाम सुरु झाल्यानंतर शेतकऱ्यांनी पीक कर्जाचा प्रस्ताव सादर केला असता त्यांना नियमानुसार सदर प्रस्ताव मंजूर करावा अशा सूचना बीड जिल्हाधिकारी यांनी बँक अधिकाऱ्यांची बैठक घेऊन वारंवार सांगण्यात आले असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना अद्यापर्यंत पिक कर्ज वाटप का करण्यात आले नाही,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१६) :(१) नाही.

याबाबत व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, बीड यांच्याकडे एकाही शेतकऱ्यांची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) नाही.

परंतू राष्ट्रीयकृत बँकांचा कर्ज वाटपाची प्रगती अहवाल पाहता जिल्हाधिकारी बीड यांनी बैठकीत सर्वच बँकांनी पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट माहे सप्टेंबर, २०१५ अखेर ८०% पूर्ण करण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

(३) राष्ट्रीयकृत बँकाकडे शेतकऱ्यांनी मागणी केलेल्या पीक कर्जाच्या अर्जावर कार्यवाही करुन पात्र शेतकऱ्यांना नियमाप्रमाणे कर्ज वाटप केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

आडस, होळ व चिंचोळी माळी (ता.केज, जि.बीड) येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेचे व्यवस्थापकांकडून अनेक शेतक-यांची पिळवणूक होत असल्याबाबत

(३१) ३६९१५ (२२-१२-२०१६). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडस, होळ व चिंचोळी माळी (ता.केज, जि.बीड) येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेकडे अनेक गावे दत्तक आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बँकेच्या शाखेचे व्यवस्थापकांकडून अनेक शेतक-यांची पिळवणूक होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बँक सन २०१२ पासून पीककर्ज देण्यास दुर्लक्ष करत आहे,हे खरे आहे का,

(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच शेतक-यांना पीककर्ज देण्यास दुर्लक्ष करणा-या व्यवस्थापकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) अशा प्रकारची कोणतीही तक्रार शासनाकडे प्राप्त नाही.
(३) नाही. हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शेतकऱ्यांना नवीन कर्ज वेळेवर मिळण्याबाबत

(३२) ३७७६२ (२२-१२-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खरीप व रब्बी हंगामामध्ये गेल्या तीन-चार वर्षापासून नैसर्गिक संकटामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून मोठ्या प्रमाणात बँकांनी कर्जाचे पुर्नगठन केले नसल्यामुळे जळगाव जिल्ह्यातील शेतकरी खाजगी व सावकारांकडे कर्जाकरिता जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना नवीन कर्ज वेळेवर व पुरेसे मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच अद्यापही जिल्ह्यातील सुमारे ३० ते ४० टक्के शेतकरी कर्जापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बँकाच्या उदासीन धोरणाबाबत शासनाने संबधित बँकाना तातडीने निर्देश दिले आहे काय,
(५) निर्देश देऊनही कार्यवाही न करणाऱ्या बँकांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०९-०६-२०१६) : (१) नाही, हे खरे नाही.

ज्या शेतक:यांनी कर्जाची मागणी केली आहे अशा शेतकऱ्यांना कर्जाचे पुनर्गठन करुन नवीन पीक कर्ज देण्यात आलेले आहे. बँकेने सन २०१२-१३ मध्ये रु. ७४५.४६ लाख व सन २०१४-१५ मध्ये रु. ७५७.९५ लाखाचे रुपांतर केले आहे व मागणीप्रमाणे शेतकरी सभासदांना कर्जवाटप केले आहे.
(२) नाही, हे खरे नाही.

शेतकरी सभासदांना त्यांच्या मागणीनुसार व बँक धोरणाप्रमाणे कर्जवाटप करण्यात आलेले आहे. सन २०१५-१६ चे पीक कर्ज उद्दीष्टाच्या जवळपास ८५ टक्के कर्ज माहे डिसेंबर, २०१५ पर्यंत वितरीत करण्यात आलेले आहे.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) शासन निर्णयाप्रमाणे शेतकऱ्यांकडील कर्जाचे रुपांतरण करुन अशा शेतकरी सभासदांना नवीन कर्ज पुरवठा करण्याबाबत बँकेला निर्देश दिलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मरोळ औद्योगिक वसाहतीतील झोपडपट्टी पुनर्वसन इमारतीत घरांचे वाटप करताना झालेला गैरव्यवहार

(३३) ३७८४४ (२२-१२-२०१५). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) येथील मरोळ औद्योगिक वसाहतीतील झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता बनविण्यात आलेल्या परिशिष्ट क्र. २ मध्ये नावे नसलेल्या लाकांना सर्वेक्षण करतेवेळी ज्यांची घरेही अस्तित्वात नसून बंद दाखविलेली आहे अशा लोकांना पुनर्वसन इमारतीत घरांचे वाटप करुन गैरव्यवहार केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेत विकासकाची नेमणूक करतांना विकासकाने विक्री करावयाच्या क्षेत्राच्या २२.५ टक्के क्षेत्र महामंडळास हस्तांतरीत करण्याच्या बोलीवर सदर निविदा मान्य करण्यात आली होती, परंतु विकासकाने २३ वर्षांचा कालावधी लोटूनही अद्यापर्यंत २२.५ टक्के क्षेत्र महामंडळास हस्तांतरीत केले नाही हे ही खरे आहे काय,

(३) झोपडपट्टी योजना राबविण्याकरिता विकासकास महामंडळाकडे उपलब्ध असलेले मोकळे भूखंड पुनर्वसन इमारती बांधण्याकरिता देण्यात आले होते, त्या भूखंडाच्या बदल्यात तेवढयाच क्षेत्रफळाचे झोपडपट्टयांचे पुनर्वसन करुन रिक्त केलेले भूखंड विकासकाने महामंडळास दयावयाचे होते ते सर्व भूखंड सुध्दा संबंधित विकासकाने महामंडळास अद्यापर्यंत दिले नाहीत हे ही खरे आहे,

(४) असल्यास, वरील सर्व बाबींमध्ये विकासकाने निविदा अटींचा भंग करुन गैरव्यवहार केल्याबाबत व त्यास संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करुन सहकार्य केल्याबद्दल त्यांच्या विरोधात अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देसाई (०८-०६-२०१६) : (१) मरोळ औद्योगिक वसाहतीतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता करारनाम्यातील तरतुदीनुसार विकासकाने सर्वेक्षण करुन झोपडपट्टी धारकांच्या दस्तऐवजावरुन तयार केलेल्या मूळ परिशिष्ट-२ यास महामंडळाने दिनांक १०/२/१९९९ रोजी मंजुरी दिली. महामंडळाने परिशिष्टामध्ये समावेश असलेल्या परंतु सर्वेक्षण करतेवेळी घरे अस्तित्वात नसलेल्या तसेच ज्या झोपडीचा उल्लेख लॉक किंवा क्लोज असा होता अशा ३८२ झोपडया वगळल्या आहेत. या झोपडयाना सदनिका वाटप करण्यात आलेले नाही.

(२) गृहनिर्माण विभागाच्या दिनांक २२/७/२०१४ च्या शासन निर्णयातील तरतुदी या चालू असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला सुध्दा लागू करणे आवश्यक असल्यामुळे विकासकाने द्यावयाच्या २२.५% क्षेत्रफळ व स्थानात तसेच परत करावयाच्या मोकळया भूखंडाच्या क्षेत्रफळात बदल झाल्यामुळे दिनांक १४/१/२०१५ रोजी झालेल्या बैठकीत ठराव पारित करण्यात आला त्यानुसार विकासकाकडून १०९२२.४१ चौ.मी.क्षेत्र महामंडळास हस्तांतरीत करावयाचे होते. त्यापैकी विकासकाने पॉकेट क्रमांक १ मधून ४२४७.७५ चौ.मी. भूखंड महामंडळास हस्तांतरीत केलेला आहे.

(३) झोपडपट्टी योजनेत वेळोवेळी झालेल्या बदलामुळे झोपडीधारकास देण्यात येणाऱ्या क्षेत्रफळामध्ये व झोपडयांच्या संख्येमध्ये वाढ झाल्यामुळे विकासकास संक्रमण शिबिर बांधण्याकरिता जागा शिल्लक राहिली नसल्याने मरोळ औद्योगिक क्षेत्रातील १७८१७..०० चौ.मीटरचे भूखंड विकासकास देण्यात आले. तथापि दिनांक १४/५/२००८ व २२/७/२०१४ च्या शासन निर्णयानुसार झोपडयांच्या पात्रतेत झालेले बदल, संख्येत झालेली वाढ, अनुज्ञेय क्षेत्रफळात झालेली वाढ तसेच प्रत्यक्ष संयुक्त मोजणीनुसार कमी झालेले क्षेत्रफळ वजा करुन विकासकाने ४३४१.६९ चौ.मी.क्षेत्र महामंडळास परत द्यावयाचे आहे परंतु पुनर्वसनाचे काम अद्याप सुरु असल्याने सदर क्षेत्र विकासकाने परत केलेले नाही.

(४) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत निविदा अटींचा भंग झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कापसावर प्रक्रिया करण्यासाठी एकही उद्योग नसल्यामुळे कापूस उत्पादक संकटात सापडल्याबाबत

(३४) ४१५५४ (२८-०४-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १० जिल्हे कापूस उत्पादनात आघाडीवर आहे, मात्र या कापसावर प्रक्रिया करण्यासाठी त्या ठिकाणी एकही उद्योग नसल्यामुळे कापूस उत्पादक संकटात सापडला आहे हे खरे आह काय,

(२) असल्यास, उद्योग वाढीसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१६) : (१) हे खरे नाही.

(२) राज्यातील कापड उद्योगाचा विकास, रोजगारामध्ये वाढ आणि कापूस उत्पादक क्षेत्रात प्राथम्याने दिर्घ मुदतीच्या आश्वासक विकासाठी कापूस ते तयार वस्त्र निर्मितीच्या विविध स्तरावरील प्रक्रिया घटकाच्या उभारणीवर विशेष भर देण्याचे उद्दिष्ट ठेऊन शासनाने शासन निर्णय दिनांक ८ जानेवारी, २०१२ अन्वये राज्याचे नविन वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले आहे. राज्यातील कापसावर राज्यातच प्रक्रिया तसेच कापूस ते तयार कापड हे राज्याचे धोरण आहे, त्याकरीता शासनामार्फत राज्यात खालील योजना राबविल्या जातात.

१. वस्त्रोद्योग प्रकल्पांना व्याज अनुदान.
२. वस्त्रोद्योग प्रकल्पांना भांडवली अनुदान.
३. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळास भांडवली अंशदान.
४. जाहिरात व प्रसिध्द योजना. (प्रदर्शाना करीता)
५. हातमाग कापड स्पर्धा व बक्षिस.
६. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळास कर्ज.

७. सहकारी सुतगिरण्यांना शासकिय भागभांडवल. (खुला)
८. सहकारी सुतगिरण्यांना शासकिय भागभांडवल. (मागास)
९. सहकारी सुतगीरण्यांच्या आधुनिकीकरणासाठी कर्ज.
१०. सहकारी सुतगिरण्यांना शासकिय भागभांडवल. (रासविनि)
११. जाहिरात व प्रसिध्दी (विभागाकरीता)
१२. वस्त्रोद्योग संकुल उभारणे.
१३.यंत्रमाग सहकारी संस्थांना भांडवली अंशदान.(NCDC)
१४.यंत्रमाग सहकारी संस्थांना कर्ज. (NCDC)
१५. साध्या यंत्रमागाचा दर्जा वाढविणे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे (जि.धुळे) तालुक्यातील सोनगीर शेतक-यांच्या हितासाठी उपबाजार समितीची स्थापन करण्याबाबत

(३५) ४१५६३ (२७.०४.२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे (जि.धुळे) तालुक्यातील सोनगीर गांव मोठ्या लोकसंख्येचे असून या गावात शेतक-यांच्या हितासाठी उपबाजार समितीची गरज असल्याचे माहे जानेवारी, २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांच्या हिताचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२३.०६.२०१६) : (१), (२) व (३) सोनगीर जि. धुळे या गावाची लोकसंख्या १७८०० इतकी असून हे गाव धुळे कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात येते. या ठिकाणी उपबाजार स्थापन करण्यासाठी धुळे कृषि उत्पन्न बाजार समितीने सन १९८२ साली ठराव करुन सन १९८४ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केलेला आहे. तथापि बाजार समितीकडून यासंदर्भात काही कागदपत्रांची पुर्तता बाकी असल्यामुळे अद्याप उपबाजारासाठी जागा मंजूर होऊ शकलेला नाही.

सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखांन्याना पाणी न देता हे साखर कारखाने बंद ठेवण्याच्या निर्णयाबाबत

(३६) ४२४३० (२७-०४-२०१६). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने पाणी टंचाईवर मात करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखांन्याना पाणी न देता हे साखर कारखाने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाची अंलबजावणी केल्यास साखर कारखान्यावर उपजिविका असणा-या सुमारे ५० लाख कर्मचा-यांवर उपासमारीची वेळ येणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शटललेस लूम साठी मिळणारे (Technology Upgradation Fund) TUF चे अनुदानाबाबत

(३७) ४२४८४ (२७-०४-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने शटललेस लूम साठी मिळणारे (Technology Upgradation Fund) TUF चे अनुदान ३० टक्के वरुन १० टक्के केले असे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमी झालेले अनुदान भरुन काढण्यासठी राज्य शासनाने काही उपाययोजना केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१६) :(१) होय,

(२) व (३) राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ धोरणांतर्गत राज्यातील वस्त्रोद्योग प्रकल्पांना बँकांनी मंजूर केलेल्या दीर्घ मुदती कर्जाच्या TUFS च्या निकषानुसारच्या पात्र रकमेवर ५ ते ७ टक्के व्याज अनुदान देण्यात येते. तसेच शासन निर्णय दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४ नुसार दिनांक २१/०२/२०१४ पासून किंवा नंतर बँकांनी मंजूर केलेल्या दिर्घ मुदती कर्जावर विव्हींग या

घटका करीता ५ टक्के दराने व्याजाची पुर्तता केली जाते. केंद्र शासनाने TUFSची सुधारीत योजना जाहीर केल्यानंतर सुध्दा राज्य शासनाकडे विव्हिंगचे ९० प्रस्ताव प्राप्त झाले असून, राज्याच्या वस्त्रोद्योग धोरणास पुरेसा प्रतिसाद मिळत आहे, असे दिसून येते त्यामुळे सदर योजनेत बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सबब प्रश्नच उद्भवत नाही.

उसाला एफआरपीनुसार एकरकमी बिल अदा करणेबाबत

(३८) ४२५०४ (२७-०४-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उसाला एफआरपीनुसार एकरकमी बिल अदा करावे असा कायदा असताना देखील मा.मुख्यमंत्र्यांनी एफआरपी चे तुकडे केले असे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्या तरतुदीनुसार हा निर्णय घेण्यात आला,

(३) असे करताना साखर संघाशी व ऊस उत्पादक शेतकरी संघटनांशी चर्चा केली होती काय ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१६) : (१) एफआरपीचे तुकडे करणेबाबत शासनाने कोणतेही आदेश काढलेले नाहीत.

शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी व साखर कारखान्यांचे प्रतिनिधी यांची बैठक होऊन त्यामध्ये सांमजस्याने एफआरपीच्या ८०% प्रमाणे देयके अदा करणेबाबत उभयपक्षात ठरले. यानुसार कारखान्यानी कार्यवाही केलेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही

शासनाने सर्व विभागातील गेल्या १५ वर्षातील सर्व रेट कॉट्रक्ट खरेदींच्या चौकशीसाठी स्थापन केलेल्या समितीच्या अहवालाबाबत

(३९) ४२८१९ (०३-०५-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सर्वच विभागातील गेल्या १५ वर्षातील सर्व रेट कॉट्रक्ट खरेदींची चौकशी सुरु केली आहे यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चधिकार समिती स्थापन केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीमध्ये कोणकोणत्या विभागाच्या सचिवांचा समावेश आहे व सदर समितीने किती कालावधीत अहवाल सादर करावयाचा आहे,
(३) असल्यास, या समितीच्या चौकशीत काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (२७-४-२०१६) :(१) होय,

शासनाच्या विविध विभागांकडून मागील १५ वर्षामध्ये झालेल्या खरेदीची चौकशी करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६/०८/२०१५ रोजी त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

(२) सदर समितीमध्ये अप्पर मुख्य सचिव (वित्त), प्रधान सचिव (उद्योग) यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे.

सदर समितीस चौकशी अहवाल सादर करण्यास निश्चित कालावधी नेमून दिलेला नाही.

(३), (४) व (५) सदर समितीच्या दिनांक ११/०९/२०१५ व दिनांक २४/११/२०१५ रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर बैठकांमध्ये समितीने, ज्या वस्तुंची खरेदीदार विभागाने खरेदी ई-निविदा प्रक्रिया राबवून करणे बंधनकारक होते, परंतु सदर मर्यादेत ज्या प्रकरणी ई-निविदा न राबविता खरेदी करण्यात आली आहे, अशा मागील १५ वर्षात वार्षिक रुपये १० कोटीपेक्षा अधिक किंमतीच्या दरकरारावर केलेल्या खरेदीची माहिती संबंधित खरेदीदार विभागाकडून संकलित करण्याची समितीने निर्देश दिले होते. त्यानुसार माहिती संकलित करण्यात आली.

त्यानंतर या संदर्भात नुकतीच मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६/५/२०१६ रोजी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये समितीने, खरेदीदार विभागांनी मागील १५ वर्षात एका वस्तूची एका वर्षात रुपये १० कोटीच्या वर, खरेदी धोरणानुसार मुभा नसलेल्या दरकरारावर खरेदी केली आहे किंवा कसे, हे तपासून त्यांच्या निष्कर्षासह अहवाल ३० दिवसात उद्योग, ऊर्जा व कामगार विभागास सादर करावा, असे निर्देश दिले असून यानुसार कार्यवाही करण्याचे संबंधित खरेदीदार विभागांना दिनांक १० जून, २०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

पुणे नगर रस्त्यावरील सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये जपानमधील कंपन्यासाठी क्लस्टर योजना राबविण्याबाबत

(४०) ४३०७८ (२७-०४-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सदा सरवणकर (माहिम),

श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे नगर रस्त्यावरील सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये खास जपानमधील कंपन्यांसाठी क्लस्टर योजना राबविण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे स्वरुप काय आहे,

(३) सदर प्रकल्पासाठी किती जमीन संपादीत करण्याचे नियोजन आहे,

(४) जमीन संपादन केलेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई तसेच सदर कंपन्यांमध्ये स्थानिकांना रोजगार देण्याबाबत कोणती योजना आखण्यात आली आहे वा आखण्यात येत आहे ?

श्री. सुभाष देसाई (१४-०६-२०१६) : (१) हे खरे आहे.

(२) अति. सुपा पारनेर औद्योगिक क्षेत्रात मोठे व लहान आकाराचे वाणिज्य/व्यापारी/निवासी भूखंड तसेच तेथे CFC,WTP, Telephone office, ESIC, MIDC Office,Hospital, Police Station, Fire station, Truck Terminus इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध असतील.

(३) अतिरिक्त सुपा पारनेर औद्योगिक क्षेत्रासाठी पारनेर तालुक्यातील मौजे वाघुंडे बु. बाबुर्डी, म्हसणे, सुलतानपूर, पळवे खुर्द व अपधुप या सहा गावातील ९२७.५६ हे.आर खाजगी व १९.१४ हे.आर सरकारी असे एकूण ९४६.७० हे.आर क्षेत्र अधिसूचित करण्यात आलेले आहे. त्यापैकी, २९४.६० हे.आर क्षेत्र महामंडळाच्या ताब्यात आलेले असून उर्वरित क्षेत्राची भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.

(४) संबंधित खातेदारांसोबत जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१/१/२०१४ व ३०/१/२०१४ राजी वाटाघाटी करण्यात येऊन वाटाघाटीमध्ये जमिनीसाठी प्रति एकरी रु. २०,००,०००/- इतका दर निश्चित करण्यात आला असून ताबा प्राप्त क्षेत्राकरिता नुकसान भरपाई वाटप करण्यात येत आहे. तसेच महामंडळाच्या नियमानुसार प्रकल्पग्रस्त खातेदारांच्या कुटुंबियांपैकी विहीत शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेल्या प्रकल्पग्रस्तास कंपनीमध्ये समाविष्ट करुन घेण्याबाबत कंपन्याना अवगत करण्यात येईल. त्याचप्रमाणे संपादित केलेल्या क्षेत्रापैकी १५ टक्के विकसित भूखंड मूळ खातेदारांना देण्याचे महामंडळाचे धोरण आहे.

महाराष्ट्रातील उद्योग कर्नाटकमध्ये जात असल्याबाबत

(४१) ४६३८६ (२७-०४-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील उद्योग कर्नाटकात यावेत याकरिता निपाणी परिसरातील ८५० एकर जागा व सर्व सोयीची उपलब्धता करुन दिली असल्याने महाराष्ट्रातील ४५० उद्योजकांनी आपली नावे

गोशिमा कडून कनार्टक सरकारकडे पाठविली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील उद्योग कर्नाटकात जाऊ नये याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देसाई (२२-०६-२०१६) :(१) या संदर्भात कोणतेही निवेदन अथवा तक्रार शासनास प्राप्त झालेले नाही.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडून उद्योजकांना जास्तीत जास्त भूखंड उपलब्ध होणेच्या अनुषंगाने पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१) कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मार्फत औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक क्षेत्राची अधिसूचना उद्योग विभागाकडून राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर अधिसूचित क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही शासनामार्फत उप जिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.६) कोलापूर यांचेकडे सुपूर्द केलेली आहे.

२) कोल्हापूर जिल्ह्यतील वेगवेगळ्या ठिकाणी असणाऱ्या औद्योगिक क्षेत्रामधील वाटप केलेल्या तथापि उद्योजकाने उद्योग सुरु न केलेले अशा भूखंडाचे गरजू उद्योजकांना पुर्नवाटप करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

३) गोकूळ शिरगाव औद्योगिक क्षेत्रातील परिवहन विभागाच्या ताब्यात असणारी २००२५ चौ.मि. जागा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाणे ताब्यात घेतलेली आहे.

४) शासनाच्या विविध विभागांकडे पडीक असणारी जागा संपादित करुन त्याचे उद्योजकांना वाटप करण्यात येत आहे.

५) राज्यातील क्षेत्रीय समतोल राखण्यासाठी राज्यातील उद्योगांना औद्योगिक प्रगतीच्या विकषाच्या आधारे विशिष्ट तालुका वर्गवारी नुसार सामुहिक प्रोत्साहने देण्यात येत आहेत. सामुहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत कोल्हापूर जिल्हा “ड” व “ड+” वर्गवारीत येतो व त्या नुसार उद्योगांना ५० % ढोबळ मुल्यवर्धीत कराचा परतावा, व्याज अनुदान, विद्युत शुल्क माफी १५ वर्ष, मुद्रांक शुल्क माफी, विद्युत दरात रु. १ प्रती युनिट सवलत तीन वर्षाकरीता, अशा सवलती देण्यात येत आहेत.

उपरोक्त वस्तुस्थिती सह राज्य शासनाने देवू केलेल्या औद्योगिक प्रोत्साहनामुळे उद्योग आकर्षित होण्यास भरीव मदत होत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयातील विविध उद्योगांनी नफ्याच्या ०२ टक्के सामाजीक उत्तरदायीत्व निधी (सि.एस.आर. फंड) शासनाकडे जमा करणेबाबत

(४२) ४६३९१ (२७-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारत सरकारने कलम १३५ अन्वये उद्योगांनी नफ्यांच्या दोन टक्के रक्कम सामाजिक उत्तरदायित्व म्हणून सामाजिक कामासाठी खर्च करावे असा नियम असतांना सुध्दा चंद्रपूर जिल्हयातील किमान ३० उद्योगांनी ५० कोटी रूपयांची निधी थकविलेली असल्याची धक्कादायक माहिती माहे मार्च २०१६ च्या सुमारास निर्देशनास आली असल्याची माहे ४ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सामाजिक कार्यासाठी उपलब्ध होणारा करोडो रूपयांचा निधी उद्योजकांनी बुडविल्यामूळे चंद्रपूर जिल्हयात विकास कामांना खिळ बसत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सामाजिक औद्योगिक दायीत्व निधी खर्च न करणाऱ्या उद्योगांची प्रशासनाकडून चौकशी करण्यात आलेली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने ग्रामीण भागातील मुलभूत सुविधांसाठी सदर निधी खर्च करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (२४-०६-२०१६) :(१) (२) व (३) सामाजिक उत्तरदायित्व निधी (सीएसआर) फंड ही बाब कंपनी अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार उद्योगांनी अंमलबजावणी करण्यासाठी आहे. कंपनी अधिनियम २०१३ अधिनियम केंद्र शासनाकडून करण्यात आलेला आहे. या अंतर्गत जमा झालेला निधी योग्य प्रकारे खर्च करण्यासाठी व त्या अनुषंगिक कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे, सदर समितीमध्ये उद्योग विभाग/जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयातील अधिकाऱ्यांचा समावेश नाही.

चंद्रपूर जिल्हयात ७ उद्योग घटकांकडून जवळपास रु. १९.१४ कोटी CSR फंड खर्च झालेला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

देऊळगांवराजा (जि.बुलडाणा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत २०१४-१५ च्या कापूस हंगामादरम्यान किरकोळ कापूस खरेदीच्या माध्यमाने बाजार समितीचा महसूल बुडवल्याबाबत

(४३) ४६४०२ (२७-०४-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगांवराजा (जि.बुलडाणा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत २०१४-१५ च्या कापूस हंगामादरम्यान किरकोळ कापूस खरेदीच्या माध्यमाने बाजार समिती सचिव व कापूस निरिक्षक यांनी बाजार समितीचा महसूल बुडवून मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी जवळखेड येथील शेतकरी भिमराव आबाराव जाधव यांनी मा.पणनमंत्री महाराष्ट्र राज्य, जिल्हा उपनिबंधक, तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने मा.पणनमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी तात्काळ सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(५) असल्यास, अहवालातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (२३-०६-२०१६) : (१), (२), (३) व (४) होय.

(५) चौकशी अहवालाच्या आधारे तत्कालीन सचिव व निरीक्षक यांचेविरुध्द रु. ५.२० लाख इतकी रक्कम वसूल करण्याची कारवाई बाजार समितीमार्फत सुरु आहे.

राज्याची हातमाग उद्योग ही पारंपारिक वस्त्र निर्मिती क्षेत्रात काम करणाऱ्या कारागीरांना अर्थसहाय्य देण्याबाबत

(४४) ४६५११ (२७-०४-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची हातमाग उद्योग ही पारंपारिक वस्त्र निर्मितीची कला काळाच्या आेघात नष्ट होऊ नये, तसेच या उद्योगास प्रात्साहन देण्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या कारागीरांना अर्थसहाय्य देण्याची योजना तयार करण्यात यावी असे निर्देश मा. वस्त्रोद्योग मंत्री यांनी माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात संबंधित अधिकाऱ्यांना दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच पारंपारिक पध्दतीने कलाकुसरीची वस्त्रे निर्माण करणाऱ्या बहुतांश हातमाग कामगारांची दयनिय अवस्था झालेली असल्याने सदर प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपूरावा केला वा करण्यात येत आहे

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी आतापर्यंत कोणती निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१६-०६-२०१६) : (१) हातमाग क्षेत्रात काम करणाऱ्या कारागीरांना अर्थसहाय्य देण्याबाबतची नवीन योजना तयार करण्यात यावी असे निर्देश मा.राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांनी दिले आहेत.

(२) व (३) हातमाग कामगारांसाठी अर्थसहाय्य देण्याबाबतची योजना राज्य शासनाच्या विचाराधीन असून सदर प्रस्तावित योजना नवीन असल्याने त्यास नियोजन व वित्त विभागाची तसेच राज्य मंत्रीमंडळाची मान्यता आवश्यक आहे. त्यानुषंगाने संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांचेकडून दिनांक ०६.०२.२०१६ रोजी प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव नियोजन विभागाच्या मान्यतेसाठी दि.१७.०४.२०१६ रोजी पाठविण्यात आला होता. सदर विभागाने उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने दिनांक १२.०५.२०१६ च्या पत्रान्वये संचालक, वस्त्रोद्योग यांचेकडून माहिती मागविण्यात आली आहे. माहिती प्राप्त होताच प्रस्ताव नियोजन विभागास फेरसादर करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाने मुंबई येथे "मेक इन इंडिया" उत्सवाचे केलेले आयोजन

(४५) ४७२३६ (१६-०५-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेक इन इंडीयाच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील महोत्सवाचे आयोजन राज्य शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ सी.सी.आय यांचे संयुक्त विद्यमाने मुंबई येथे दिनांक १३ ते १८ फेब्रुवारी, २०१६ रोजी केले होते, हे खरे आहे काय, तसेच, सदर

कार्यक्रमास मा.उच्च न्यायालयाने दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास परवानगी नाकारली, हे ही खरे आहे काय व परवानगी नाकारण्याची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, सदर आंतरराष्ट्रीय सप्ताहास शासनाने किती निधीची तरतूद केली आहे, तसेच केंद्र शासनाकडून किती आर्थिक मदत देण्यात आली आहे,

(३) असल्यास, मुंबईत "मेक इन इंडिया" सोहळ्यामध्ये "मेक इन महाराष्ट्र" ही मोहिम मा.मुख्यमंत्री यांनी जाहीर करून राज्यात मोठ्याप्रमाणात गुंतवणूक येणार असल्याची घोषणा दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, "मेक इन इंडिया" च्या माध्यमातून उभ्या राहणाऱ्या प्रकल्पातून किती नव्या रोजगारांबाबत राज्य शासनाने सामंजस्य करार केले आहेत व किती कोटींची गुंतवणूक होणार आहे, तसेच त्यामुळे किती व्यक्तींना रोजगार उपलब्ध होणार आहे व सदर रोजगार कोणत्या विभागात वा कोणत्या जिल्ह्यात उभे करण्यात येणार आहेत,

(५) तसेच "मेक इन इंडिया" अंतर्गत गिरगांव (मुंबई) चौपाटीवर आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमास मुंबई महापालिकेने रूपये दहा कोटीची देणगी दिली असतानाही सदरहू कार्यक्रमाचे निमंत्रण मुंबईतील सर्व नगरसेवकांना देण्यात आले नव्हते याबाबतची वस्तुस्थिती काय आहे,

(६) सदर कार्यक्रमाच्या रंगमंचाला दिनांक १४ फेब्रुवारी, २०१६ रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास भिषण आग लागली होती त्याची चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (२०-०६-२०१६) :(१) केंद्र व राज्य सरकारने उद्योग करणे सोपे (Ease of Doing Business) Make in India या उपक्रमाद्वारे उद्योगांसाठी केलेल्या विविध सुधारणांचा व्यापक प्रचार व प्रसार करणे व त्याद्वारे देशात व राज्यात औद्योगिक गुंवणूक आकर्षित करण्याच्या हेतूने दिनांक १३ फेब्रुवारी, ते १८ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत मुंबई येथे "मेक इन इंडीया" सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय पाहुण्यांसाठी तसेच उद्योग जगतातील पाहुणे यांना महाराष्ट्राचे सांस्कृतिक दर्शन घडविण्याच्या उद्देशाने या सप्ताहादरम्यान कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज (सौ.आय.आय) यांच्या सहाय्याने शासनाच्या उद्योग विभाग व महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळ यांनी संयुक्तरित्या दिनांक १४.२.२०१६ रोजी गिरगांव चौपाटीवर "महाराष्ट्र रजनी" या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

सदर कार्यक्रमास मा. उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय समितीने व न्यायालयाने ठरविलेल्या नियमानुसार गिरगाव चौपाटी ही रामलीला,कृष्णलीला, गणेश विसर्जन व क्रिसमस या समारंभाकरिता देण्यात यावे असे सूचित केले होते. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाने सदर कार्यक्रमास परवानगी नाकारली होती.

(२) "मेक इन इंडीया" कार्यक्रमाकरिता रु. ५२ कोटी ४६ लाख ८२ हजार पाचशे दहा इतका निधी लागणार आहे. केंद्र शासनाने बांद्रा-कुर्ला कॉम्लेक्स येथील महाराष्ट्र पॅव्हेलियन व्यतिरिक्त इतर खर्च केला आहे.

(३) होय, हे खरे आहे,

(४) सदर कार्यक्रमास उद्योग जगताकडून तसेच सामान्य जनतेकडूनही प्रचंड प्रतिसाद प्राप्त झाला असून त्यात विविध क्षेत्रातील अनेक देशी विदेशी कंपन्यांनी राज्य शासनासमवेत गुंवणूकीचे करार केले आहेत. दिनांक १३ ते १८ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत आयोजित "मेक इन इंडीया" सप्ताहात उद्योग उर्जा, गृहनिर्माण,पायाभूत सुविधा, बंदर विकास, कौशल्य विकास, कृषी, पशुसंवर्धन,पर्यटन व आरोग्य इत्यादी विविध क्षेत्रातील अनेक देशी विदेशी अशा एकूण २५९४ कंपन्यासमवेत गुंणवणूकीचे करार करण्यात आले असून त्यामधील एकूण आश्वासीत गुंतवणूक करार करण्यात आले असून त्यामधील एकूण आश्वासीत गुंतवणूक सुमारे रु. ८ लाख कोटी होणार असून सुमारे ३० लाख व्यक्तींना रोजगाराच्या संधी प्रस्तावित आहेत.

"मेक इन इंडीया" या कार्यक्रमांतर्गतच्या सप्ताहात राज्यात विभाग निहाय गुंवणुक पुढील प्रमाणे प्रस्तावित आहे. कोकण विभागात रु. ३.४५ लाख कोटी (४३%) मराठावाडा व विदर्भ विभागामध्ये रु. १.३० लाख कोटी (१६%) नाशिक विभागात रु. ३१ हजार कोटी (४%), पुणे विभागामध्ये रु. ४२ हजार कोटी (५%) आणि ठाणे-बदलापूर पट्टा- रु. १.६५ लाख कोटी (२०%) व विविध ठिकाणचे प्रकल्प रु. ९२ हजार कोटी (१२%) गुंतवणुक अपेक्षित आहे.

(५) हे खरे नाही.

(६) प्रस्तूत विषयी मुख्य अग्निशमन अधिकारी, मुंबई महानगरपालिका यांनी दिलेल्या प्राथमिक चौकशी अहवालात पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविला आहे. सदर अहवालाप्रमाणे आगीचे संभाव्य कारण हे सदोष विद्युत यंत्रणा Defective Electric Circit-Electric Spark from the Electric wirings came in contact with the combustible materials underneath the stage contributed by negligence of the organizers/event management company by storing highly combustible materisl below the stage that has aggravated the fire हे आहे. त्यानुसार व्यवस्थापन कंपनी विरुध्द गिरगाव पोलिस ठाणे येथे गुन्हा नोंदवण्यात आला आहे व त्याचा तपास चालू आहे.

श्री.भोगावती सहकारी साखर कारखाना परिते (जि.कोल्हापुर) कारखान्यामध्ये अकुशल कामगार मजुरांची भरती केल्याबाबत

(४६) ४७२९६ (२७-०४-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.भोगावती सहकारी साखर कारखाना परिते (जि.कोल्हापुर) कारखान्यामध्ये अकुशल कामगार मजुरांची दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी भरती झाल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखर सहसंचालक कोल्हापूर यांचेकडील नोकर भरती विरोधातील तक्रार प्राप्त झाली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कारखाना प्रशासनावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१६) :(१) होय.
(२) होय.
(३) या संदर्भात चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवाल दिनांक ०६/०५/२०१५ रोजी सहसंचालक (साखर) कोल्हापूर यांना सादर केला आहे. सदर अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उस तोडणीयंत्र खरेदी करण्यासाठी शेतक-यांना दरवर्षी राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या प्रस्तावाला शासनाकडून मंजुरी मिळाली नसल्याबाबत

(४७) ४७३१९ (२७-०४-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राज पुरोहित (कुलाबा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०११-१२ मध्ये उस तोडणीयंत्र खरेदी करण्यासाठी शेतक-यांना दरवर्षी राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत राज्यशासनाकडून २५ टक्के व केंद्रशासनाकडून २५ टक्के अनुदान देण्याचे धोरण जाहीर करण्यात आले होते काय,
(२) असल्यास, कमी मनुष्यबळाच्या वापराने त्याचा फायदा साखर कारखान्यांना होते परंतु २०१५ मध्ये ऊस तोडणी यंत्राच्या राष्ट्रीय विकास योजनेच्या प्रस्तावाला शासनाकडून मंजुरी मिळाली नसल्याचे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू योजनेच्या प्रस्तावाला शासनाकडून मंजुरी न मिळण्याची कारणे काय,
(४) राज्यशासनाकडून देण्यात येणारे अनुदान अद्याप पर्यन्त सदर शेतक-यांना देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय, असल्यास, सदर अनुदान देण्यात येणार आहे का व केव्हा देण्यात येणार आहे,
(५) अनुदान वाटपासाठीच्या विलंबास कोण जवाबदार आहे व त्यांचेवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१६) : (१) सन २०११-१२ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत ऊस तोडणी यंत्रास २५ टक्के अथवा रु. २५ लाख यापैकी जी रक्कम कमी असेल इतक्या रकमेइतके अनुदान देण्याचा निर्णय दिनांक ८ डिसेंबर, २०११ व २९ डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.
(२), (३), (४) व (५) ऊस तोडणी यंत्रास राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत ४०% अनुदान देण्यासंदर्भात प्रस्ताव विचाराधीन आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत

(४८) ४८२३३ (२८.०४.२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तब्बल एक कोटी १६ लाख जेष्ठ नागरिकांच्या धोरणातील तरतुदीनुसार वृद्धांच्या उदरनिर्वाहावर तीन वर्षात केवळ दोन कोटी ५४ लाख रुपये करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच या धोरणानुसार प्रत्येक महिन्याला एका वृध्दामागे भोजन, कपडे, अंथरून-पांघरुणाचे साहित्य तसेच औषधोपचार यावर १० हजारांचा खर्च अपेक्षित असतानां शासन केवळ ९०० रुपये अनुदान देत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अपुऱ्या अनुदानामुळे वृधाश्रामांत वृद्धांची हेळसांड होत आहे, हे ही खरे आहे काय, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) ज्येष्ठ नागरिकांच्या अनुदानात वाढ करण्या बरोबर केंद्र शासनाच्या धोरणानुसार ६५ वरून ६० वर्ष करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरूप काय आहे ?

श्री. राजकुमार बडोले (२३.६.२०१६) :(१) होय, अंशत: खरे आहे.

(२) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार प्रतिवृध्द प्रतिमाह रु. ९००/- याप्रमाणे अनुदान देण्यात येते.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

केंद्र शासनाच्या स्मार्ट अप योजनेला चालना देण्यासाठी
नाविन्यता परिषद स्थापन करण्याबाबत

(४९) ४८७३१ (०१-०६-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **मा.मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या स्मार्ट अप योजनेला चालना देण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य नाविन्यता परिषद स्थापन करण्याचा व परिषदेला संस्था नोंदणी अधिनियमानुसार स्वतंत्र सहकारी संस्था म्हणून नोंदणी करण्यास मान्यता देण्याचा निर्णय दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास राज्य शासनाने घेतला आहे व यासाठी पुणे आणि मुंबई येथे जागा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नाविन्यता परिषदेची रचना कशाप्रकारे निश्चित करण्यात आली आहे,

(३) यासाठी पुणे व मुंबई येथे किती व कोणत्या ठिकाणी जागा उपलब्ध करण्यात येणार आहे व त्यामध्ये कोणते उपक्रम राबविण्यात येणार आहे व त्याचे उद्दिष्ट कसे ठरविण्यात आलेले आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) : (१) दिनांक ०४/०३/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य नाविन्यता परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. तसेच, दिनांक २०/०२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य नाविन्यता परिषदेस नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत नोंदणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) राज्य नाविन्यता परिषेदच्या नियामक मंडळाची रचना दिनांक २०/०२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये स्पष्ट करण्यात आली आहे, या नियामक मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष मुख्य सचिव असून सह अध्यक्ष डॉ. रघुनाथ माशेलकर आहेत तसेच, महासंचालक, विज्ञान व तंत्रज्ञान पार्क, पुणे हे सदस्य सचिव आहेत

(३) राज्य नाविन्यता परिषदेला पुणे व मुंबई येथे जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु असून शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. एनआयसी २११३/२०१३/का.१४७१, दिनांक ०४/०३/२०१४ अन्वये निश्चित केल्यानुसार राज्य नाविन्यता परिषदेचे कार्य राहील त्याचप्रमाणे परिषदेने मा. पंतप्रधानांच्या स्टार्टअप इंडिया या कार्यक्रमाकरिता कार्य करणे आवश्यक राहील.

जालनासह राज्यातील ५१ पैकी २५ स्टील कारखाने
मंदीमुळे बंद झाले असल्याबाबत

(५०) ५००१२ (२७-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालनासह राज्यातील ५१ पैकी २५ स्टील कारखाने मंदीमुळे बंद झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चीनचे स्टील जगभर निर्यात हाेत असल्याने आणि स्वस्त असल्याने त्याचा फटका राज्यातील स्टील उद्योगाला बसला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील स्टील उद्योगाला उर्जितावस्थेत आणण्याकरीता शासन कोणत्या उपाययोजना करत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (२४-०६-२०१६) :(१) हे खरे आहे.

जालनासह राज्यामध्ये एकूण नोंदणीकृत स्टील उद्योगांची संख्या ६०७ इतकी आहे. त्यापैकी चालू स्टील उद्योगांची संख्या ४३५ इतकी असून विविध कारणांमुळे बंद झालेल्या स्टील उद्योगांची संख्या १८२ इतकी आहे.

(२) १) जागतिक आर्थिक मंदी, २) बाजारपेठेतील तीव्र स्पर्धा व स्टील मागणीचा अभाव, ३) कच्चा माल वेळेत न मिळणे, ४) महागडी वीज व वीज कपात, ५) कामगारांच्या अडचणी, ६) वाहतूक खर्च, ७) अपूरे खेळते भांडवल तसेच मार्केट व मॅनेजमेंट अडचणी इत्यादी कारणां अभावी राज्यातील स्टील उद्योगामध्ये मंदी दिसून येते.

(३) व (४) महाराष्ट्र शासनाने औद्योगिक वाढीसाठी वेळोवेळी औद्योगिक धोरण जाहिर केलेले आहे. त्यामध्ये साप्रोयो-२००७ ते २०१३ या औद्योगिक धोरणामध्ये जालना जिल्हा हा मानव निर्देशांक कमी असलेला जिल्हा असल्याने तेथील उद्योगांना विविध सवलती जाहिर केलेल्या आहेत, त्यामध्ये ७५ टक्के स्थानिक रोजगार निर्मिती करणाऱ्या उद्योगांना FSI व PF या योजनेंतर्गत ५ वर्षासाठी भरणा केलेल्या रक्कमेमधील ७५ टक्के रक्कमेचा परतावा देण्याचे धोरणही जाहिर केले होते. तसेच जालना जिल्ह्यामध्ये रोजगार निर्मिती व्हावी यासाठी विशाल प्रकल्पांची मर्यादा गुंतवणुकीमध्ये रु. १०० कोटी व २५० कोटी रोजगार निर्मिती प्रकारे करण्यात आली होती.

साप्रोया २०१३ मध्ये सुध्दा लघु उद्योगांना विविध सवलती जाहिर केल्या असून त्यामध्ये आधुनिकीकरणासाठी यंत्रसामुग्रीसाठी ५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु. २५ लाख अनुदान तसेच इतर अनुषंगिक सवलती जाहिर केल्या आहेत. जालना जिल्हा हा D+ मध्ये येत असल्याने येथील उद्योगांना ८० टक्के पर्यंत औद्योगिक प्रोत्साहने देण्यांत येतात.

बंद कारखाने सुरु करण्याबाबत शासनाकडून वेळोवेळी उपाययोजना करण्यात येतात. मुंबई सहाय्यक उपक्रम (खास उपबंध) अधिनियम, १९५८ नुसार बेकारीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा बेकारीचे निवारण करण्यासाठी उपाययोजना म्हणून आजारी उद्योग घटकास सहाय्यक उपक्रम घोषित करण्यात येते.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.